# प्रेसनोट

दि.१८/०६/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | भिंगार कॅम्प पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.३५५/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | जहीर अहमद इकबाल मुलाणी,वय-३० वर्ष, व्यवसाय-फायनान्स रिकव्हरी, सहुरा एंटरप्राईजेस, अहिल्यानगर, रा.एकनाथ नगर, रहेमानिया मस्जीद जवळ, नेप्ती रोड, केडगाव, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | २०,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी सन २०१७ साली पिरामल फायनान्स/डी.एच.एफ.एल. या बॅकेकडुन १४,९२,४७१/- रूपये गृहकर्ज घेवुन घर खरेदी केले होते. त्या गृह कर्जाचे तक्रारदार यांनी सन २०२२ पर्यंत नियमित हप्ते भरले होते. सन २०२२ साली तक्रारदार यांचे कौटुंबीक कारणास्तव ते बॅकेकडुन घेतलेल्या गृहकर्जाचे हप्ते भरू शकले नाही. तेव्हा तक्रारदार यांना बॅकेने घराची जप्तीची नोटीस पाठविली होती. त्या नोटीसचे तक्रारदार यांनी काहीही उत्तर दिले नाही.त्यानंतर तक्रारदार यांना दिड वर्षानी मंडळ अधिकारी, भिंगार कार्यालय, अहिल्यानगर यांचेकडुन दि.१३/५/२०२५ रोजी नोटीस मिळाली होती त्यात तक्रारदार यांचे घर ताबा देणेकामी दि.११/६/२०२५ ला समक्ष उपस्थित रहावे असे लिहीले होते. दि.१०/६/२०२५ रोजी तक्रारदार यांना संध्याकाळी त्यांचे घराचे जप्ती करणारे सहुरा एंजन्सीचे कर्मचारी जहीर मुलाणी यांचा फोन आला. त्यांनी तक्रारदार यांना सांगितले की उदया तुमच्या घरावर ताबा घ्यायला येणार आहे. जर तुम्हाला घराचा ताबा घेण्याची तारीख वाढवायची असेल तर तुम्हाला मंडळ अधिकारी दळवी मॅडम यांना २०,०००/- रूपये दयावे लागतील. तेव्हाच ते तुमच्या घराचे जप्तीची तारीख वाढवुन देतील. तुम्ही या, मी तुमची दळवी मॅडम सोबत भेट घालुन देतो. तेव्हा तक्रारदार यांना समजले की, सहुरा एंजन्सीचा कर्मचारी जहीर मुलाणी हा तक्रारदार यांचे घराचे जप्तीची तारीख मंडळ अधिकारी दळवी मॅडम यांचेकडुन वाढवुन देण्याच्या निमीत्ताने त्यांचेकडे लाच मागत आहे, अशी तक्रार दिली.<br><br>उपरोक्त लाच मागणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.१२/०६/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी करण्यात आली. आरोपी खाजगी इसम जहीर अहमद इकबाल मुलाणी यांनी तक्रारदार यांचे घराचे जप्तीची तारीख मंडळ अधिकारी कार्यालय, भिंगार येथील मंडळ अधिकारी श्रीमती दळवी मॅडम यांचेकडुन वाढवुन देण्याकरीता आरोपी जहीर मुलाणी यांनी त्यांचे मंडळ अधिकारी यांचे सोबतच्या ओळखीचा प्रभाव पाडुन मंडळ अधिकारी यांचे नावाने स्वत:करिता २०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. दि.१७/०६/२०२५ रोजी आरोपी जहीर मुलाणी याने पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडुन २०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता आरोपी जहीर मुलाणी यास रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार
अॅप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :- ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर